

# तो, मी आणि सिगरेट

कवयित्री - स्वप्ना कोल्हे

© २०१० सर्व हक्क सुरक्षित

साहित्य प्रतिष्ठान

# – अर्पणपत्रिका –

दोस्तांनो, 'तो,मी आणि सिगरेट' हे नवीन ओरिजिनल ई बुक आज आम्ही आपल्या समोर सहर्ष सादर करीत आहोत.वरवर पाहता ह्या सिगरेटच्या कविता वाटतील..आहेतच.पण त्यांच्याआड एक हळुवार व संवेदनशील प्रेमकथा उलगडत जाते.वळणावळणांची...आशा,निराशा यांचा लपंडाव त्यात दडलेला आहे.सिगरेट ओढणाऱ्या नायकाची मानसिकता आणि त्याच्यावर जीवापाड प्रेम करणाऱ्या नायिकेची हतबलता आहे.व्यसन विरुध्द प्रेम ही जीवघेणी लढाई देखील ह्या कवितांत आहे.तसेच,भावनांचा चढउतार व टोकाच्या भूमिकेपर्यंत जाणेही आहे.

हा कडाक्याचा संघर्ष,ही सर्व शक्ती पणाला लावलेली रस्सीखेच केवळ सिगरेटपुरती मर्यादित राहत नाही.जीवनातल्या सर्व प्रकारच्या कमजोरींवर आणि नैराश्यांवर ईलाज करण्याची शक्ती आणि सत्ती प्रेमातूनच निर्माण होते.या छोट्याशा ई बुकमधून मिळणारा हा सुगंधी संदेश आपण आपल्या मित्र मैत्रिणींना फॉरवर्ड करावा ही ईच्छा. 'तो,मी आणि सिगरेट' हे पुस्तक कसं वाटलं,ह्या पुस्तकामुळे तुमच्या विचारांत काही बदल झाला का ? हे आम्हाला बिनधास्त esahitya@gmail.com या पत्त्यावर कळवा.आवडलं तर आपल्या मित्र मैत्रिणींना फॉरवर्ड करा आणि भाव खा.या पुढली आणि आधीची दर्जेदार प्रकाशनं आपल्याला विनामूल्य मिळण्यासाठी आपण esahitya@gmail.com या पत्त्यावर नोंदणी करु शकता.

व्यसनमुक्तीसाठी अहोरात्र काम करणाऱ्या सर्वांना हे ई बुक मनःपूर्वक अर्पण.


नाम गुम जायेगा

समन्वयक – ई साहित्य प्रतिष्ठान

esahitya@gmail.com

M – 9869674820

## * कारण *

हो.ओढतो मी सिगरेट
कारण ?

नैराश्य
तणाव
व्यसन
????

**Leave it** यार
धुंद व्हायला कारणं कशाला हवीत ?





## * So called *

स्वतःला **So called** मर्द सिध्द
करण्यासाठी
**So called** मित्रांची दोस्ती
टिकवण्यासाठी
मी तुला जवळ केले

तू....**So called** जन्नत..
( तू मला नरकात ढकलले )

कॉलेज संपले
मित्र पांगले

पण
जातांना
माझं **So called life**
धुराडं बनवून गेले..

# * अस्वस्थ *

आभाळ भरते
मन अस्वस्थ होतं
सिगरेट पेटते
पाकीट हलकं होतं
कश्श मागून कश्श
तन पेटत राहतं
राखेवर राख
काळीज भरत राहतं
थेंबावर थेंब
तळं साठत जातं
धूरावर धूर
बळ वाढत जातं
भुकेलं हृदय
तुला मागत राहतं
कोरडे ओठ
ओल शोधत राहतं
पाकीट संपतं
सिगरेट विझते
मन अस्वस्थ होतं
आभाळ भरते





*** I love सिगरेट ***

**Really,I love** सिगरेट

जरी जीवनाचा शेवट मृत्यू आहे
तरी आपण जीवनावर प्रेम करतोच ना ?
कितीही बेईमान असलं तरी..

मग ?

जरी सिगरेटचा शेवट राख आहे
तरी जीवन मृत्यू मधल्या काळात

हे बेईमान आयुष्य सहन करण्यासाठी..
जी **Kick**
जी झिंग
मला ती देते

**I love** सिगरेट **for that..**

# * Chain Smoker *

माझं एकीने भागत नाही
दूसरी
मग तिसरी..

सगळ्याजणी एक सारख्याच तरी वेगळ्या
तीच काया
तोच गंध
तीच माया
तोच बंध

साखळीत
मी तिला अडकवलंय ?
की तिने मला ?
माहित नाही

पण,
ह्या साखळीतून आता सुटका नाही
धूरातच जगायचं व्यसन लागलंय
धुकं मला मानवणार नाही..





# * झुरके *

झुरक्यांच्या वलयात
आठवांचे तरंगणे
धुराच्या कणकणात
आसवांचे विव्हळणे

खडकाळ जाहले जरी
किनारे मनाचे
लाट कठोरशी
पुन्हा पुन्हा आदळते

कधी संपेल रे
खेळ हा नियतीचा
एकला जीव जळे
( जग म्हणे ) धूर हा सिगरेटचा..

* तू विरुध्द ती *

मला माहितीये
तुला ती आवडत नाही
तुला माहितीये
मला ती सोडवत नाही

तरी तू हट्टाला पेटते
तिच्याविषयी माझे कान भरते
तरी ती माझ्या मनाला भिडते
कारण ती..न बोलता माझे ओठ शिवते

शिक तू काही तिच्याकडून
पहा तूही निमुट जळून
प्रेम करते ना माझ्यावर ?
पहा तूही राख होऊन..





## * तल्लफ *

नुसतं तिचं नाव काढलं तरी
तल्लफ लागते

तिचा गंध
तिची तनु
तिने फुलवलेला माझा अणुरेणू

पण,
आता फक्त आठवणीचे थोटुक उरलेत
तिचे..

कारण,
( डॉक्टर म्हणताहेत )
दिवस थोडेसेच उरलेत
माझे....

# * रिकामा **ashtray** *

थोटकांनी भरलेला **ashtray** रिकामा रहायला लागला
आणि खोलीतल्या कुंडीतला गुलाब बहरायला लागला
तरी तुला कळलंच नाही,मला काय म्हणायचंय ते

आयुष्याचं गणित चुकलेलं,वाट फुटेल तिकडे धावत होतो
अशक्याच्या झाडावर चढून आशेची पतंग काढत होतो
कल्पनेच्या विश्वाची राणी तू,मला सत्याचाच विळखा होता

भेग गेलेल्या भिंतीत जेव्हा मुंग्या रहायला आल्या
रात्री साखरेची वाटी ओट्यावर ठेवायला लागलो
अनुभवलं नाही पण सांगायचो गर्दीच्या ठिकाणी राहतो

म्हणून आता ओठांतून लाव्हा बाहेर येत नाही
डोळे अजूनही फुटू पहातात,तेव्हा श्वास रोखतो मी
अंधारतं तरी,भग्न हृदयातून श्वासांचे अंकुर उमलतात

आणि,सगळं सगळं दृष्य सूर्यजन्मवेळच्या अंतराळासारखं
तेजोमय होऊ लागताच,मी तुझ्या कवितांना कवळतो
आणि तुला वाटतं,मला तुझ्या कविता कळतच नाहीत





## * लाव्हा *

का धरु पाही निखारे
रे यारा
उसळे धमन्यांत तुझ्या लाव्हा
रे उधळे
धमन्यांत तुझ्या लाव्हा
भिकार ती सिगरेट
जलफळून मरे,उरे राख,निशाणी
रे यारा
उद्रेक अवनीचा तू थेट
रसरसून जगे,उरे नाम,निशाणी
रे उसळे धमन्यांत तुझ्या लाव्हा
घर घेतसे पेट
तळमळून बोले,हैराण प्राण
रे यारा
नभ शलाकेची तू भेट
लखलखून चमके,वैराण प्राण
रे उसळे धमन्यांत तुझ्या लाव्हा
धमन्यांत तुझ्या लाव्हा
रे यारा
का धरु पाही निखारे
रे उसळे धमन्यांत तुझ्या लाव्हा

## * Objection *

नाही नाही
माझं अजिबात **objection** नाही
ओढ तू सिगरेट

मी काही म्हणणार नाही

जेव्हापासून तुझी झालेय
माझ्यात माझं स्वतःचं असं काही उरलेय ?

तुझ्या सिगरेटचं पाकीट जेव्हा संपेल तेव्हा संपेल
पण
मी मात्र तुला काही होण्याआधीच संपेल

तुझं कितीही **objection** असलं तरीही....





# * आम्ही नाही जळत कुणावर *

जा जा
आम्ही नाही जळत कुणावर
जा जा आम्ही नाही जा
आम्ही नाही जळत कुणावर

फेक तू खुशाल झुरके हवेत
खेच तू जवळ तिला मजेत
आम्ही नाही जळत कुणावर
छातीच्या पिंजऱ्यात जमू दे राख
ओठांच्या पाकळ्यांचा उडू दे निखार
आम्ही नाही जळत कुणावर

तीच डोक्यात राख घालून येते
मजकडे पाहून जळ जळ जळते
बघ ना तुलाही चटका देते
तव मनी मज पाहून तीळ तीळ तुटते
चिरडून तू टाकतो,तिची जिरते
तीच डोक्यात राख घालून घेते
बघ ना,तीच राख होऊन जाते
आम्ही नाही जळत कुणावर

## * झुळूक आणि झुरके *

पहाटेच्या गार झुळकेने
मला जाग आली

तू खिडकीत पाठमोरा

वाटलं
असं उठावं
आणि माझं आकाश मिठीत घ्यावं

उठले

पण

क्षितीजरेषा सिगरेटच्या झुरक्यांत हरवलेली दिसली
अन
आकाश तर दूरच राहिले

पण माझ्या पायतळीची जमीनही खचली..





* कहाणी *

कधी तू तिला पेटवलंस
तर
कधी मला
माझा थेंब अन थेंब तहानला तुझ्यासाठी
अन तू
झुरक्यांची आग लपेटून फिरत राहिलास
जोगी बनून
पण बघ
बघ आज
तुझ्या ओठातून खेचून तिला पायदळी चिरडलंय मी
आता ती उरली नाही
आणि ,
मी ? मिळणार नाही..
उरलीय फक्त
विझलेल्या थोटकाच्या राखेची कहाणी..

## * मुलं *

तुला लहान मुलं किती आवडतात
माहितीय मला..

लोकांच्या मुलांबरोबर खेळतांना
त्यांच्यात रमतोस,स्वतःस पाहतोस
किती जगतोस..
माहितीय मला

ते रडले की तुझ्या डोळयांत पाणी
ते हसले की तुझ्या ओठांत गाणी

म्हणूनच..
मी आपल्याला बाळ होऊ देणार नाही
हो....

कारण,
ना तू सिगरेट सोडू शकतो
ना आपल्या मुलांचं रोगट आयुष्य पाहू शकतो

तुला लहान मुलं किती आवडतात
माहितीय मला..





## * Passive Smoking *

माझे सारे सुखं तुझे
तुझे सारे दुःखं माझे

तुला मी म्हटले होते
लग्नापूर्वी
आणि तशीच वागले
लग्नानंतरही

तुला मी इतकं सुख दिलं की
आनंदाने तुझे डोळे भिजले
आणि
तू मला इतकं दुःखं दिलं की
धूराने माझे डोळे मिटले

## * पर्याय *

तुला मी दोन पर्याय देते
त्यापैकी एक निवड

आता

तू एक तर
तिला काडी लाव

नाहीतर
..
मला





## * शपथ *

या ओठांची शपथ तुला
ओठ तुझे
ना मिळणार तिला
ना मिळणार तिला
या ओठांची शपथ तुला

येऊ दे रात तुफानी
होऊ दे बात पुरानी
कंठात गोळा प्राण सारा
नसांत उठू दे भयाण वारा
मनी धडधड
उरी तडफड

या नजरेची आण तुला
नजर तुझी ना शोधणार तिला

या ओठांची शपथ तुला
ओठ तुझे
ना मिळणार तिला
ना मिळणार तिला
या ओठांची शपथ तुला

## * चेहरा *

तुला माझा चेहरा वाचता येतो
म्हणून..

मी तुला कधी म्हटलं नाही
की,सिगरेट ओढू नकोस
तरी,तू सिगरेट सोडली

डोळ्यांत पूर यायचा
मन आक्रोश करायचं
धूरात जीव गुदमरायचा

पण,मी तुला कधी म्हटलं नाही
की,सिगरेट ओढू नकोस
तरी,तू सिगरेट सोडली

तुला माझा चेहरा वाचता येतो
म्हणून..




तो,मी आणि सिगरेट
– संकल्पना,लेखन,सजावट व मांडणी –
स्वप्ना कोल्हे , नाशिक
Cigarette Smoking Is Injurious To Health
प्रकाशक आणि वितरक
साहित्य प्रतिष्ठान
Say YES to Life & NO to Cigarette

# - प्रकाशकाचे शब्द -

रसिकांना नेहमी उत्तमोत्तम आणि नवनवीन दर्जेदार काव्य पुरविण्याचा ई साहित्य प्रतिष्ठानचा ध्यास आहे.ई साहित्य आपल्यासाठी नवनवीन ई बुक्स सातत्याने प्रकाशित करत असते.आमच्या विनामूल्य ई बुक्स साठी ताबडतोब नोंदणी करा. esahity@gmail.com ला फक्त एका शब्दाची ईमेल करा..'नोंदणी करा'.अशी बस्स.आणि या वर्षातली ई बुक्स ची सिरीज आपल्या मेल ईनबॉक्स मध्ये धडाधड येऊन पडेल बघा !पहिला येईल त्याला पहिलं पुस्तक.ई बुक्स हे साहित्याचं भविष्य आहे.आपणही ह्या नवीन ई साहित्य महायज्ञात सामील व्हावं असा आमचा प्रेमळ आग्रह.इंग्रजी भाषेत ५ लाखाहून अधिक ई बुक्स आहेत.तर मराठीत शंभराच्या आसपास.हे चित्र बदलायचंय.यासाठी आपण आमच्या सोबत या,संपर्क साधा.

आमची नेटाक्षरी वगैरे नियतकालिकं देखील नियमित प्रकाशित होत असतात.नेटाक्षरी हा साप्ताहिक अंक सध्या सुमारे ५०००० मराठी रसिकांना विनामूल्य वितरीत केला जातो.त्या व्यतिरिक्त संकेतस्थळाला भेट करुन अंक,ई बुक वाचणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे.लवकरच ही संख्या १ लाखावर नेण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.दर आठवड्याला आमची नवनवीन विषयाला वाहिलेली विनामूल्य ई साप्ताहिकं येतीलच.मराठी भाषेत एका वादळी झंझावाताने प्रवेश केला आहे.काव्यांजली,मराठी कविता,मराठी कविता प्रेमी,कवितांचं घर इ.४०,००० हून अधिक सभासद असणाऱ्या कम्युनिटीजच्या सदस्यांनी चालवलेलं हे जबरदस्त व्यासपीठ आपल्यास प्रेमाचं आमंत्रण देतं आहे.

ई साहित्य प्रकाशनाची स्वर नेटाक्षरी,ई दिवाळी अंक ही प्रकाशनं सातत्याने सुरुच असतात.प्रत्येक मराठी ईमेलधारक,इंटरनेटला जोडलेला प्रत्येक मराठी माणूस आमच्या ह्या चळवळीत जोडला जावा हा आमचा ध्यास आहे.मराठी साहित्य नव्या ई युगात सर्वोच्च स्थानावर जावं,मराठीच्या अभिव्यक्तीची ताकद जगभर पसरलेल्या नव्या पिढीला जाणवावी हा आमचा प्रामाणिक उद्देश आहे.नवीन मराठी साहित्यिकांना व्यक्त होण्यासाठी नवीन व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याचाही आमचा हेतू आहे.

तेव्हा संपर्कात रहा.आपल्या मित्र मैत्रिणींचे आयडी आम्हास पाठवा.आपले अभिप्राय कळवा.काही खटकले तर तेही लिहा.आवश्यक आहे हो.हा आपल्या सर्वांचा उपक्रम आहे.चार लोकांत चांगल नाव झालं पाहिजे ना !

आमचे ई बुक्स व ई अंकांना भरभरुन मिळणाऱ्या तुमच्या प्रतिसादांनी आमचा उत्साह द्विगुणीत होतोय.हे ई बुक आपण आपल्या ईष्टमित्रांना फॉरवर्ड करण्यास आमची काही हरकत नाही परंतु असे करताना आमच्या आयडीचा अंतर्भाव केल्यास आम्ही आपले आभारी राहू. मराठी कवितेची लोकप्रियता वाढवण्यास आपला हातभार लाभावा हीच इच्छा.

जगभरात विखुरलेल्या मराठी माणसाला शब्दांनी जोडायचा आमचा संकल्प सिध्दीस जाईल असा आम्हाला विश्वास आहे.कळावे,लोभ असावा ही विनंती.आपला मित्र..

नाम भुम नायेगा
समन्वयक – ई साहित्य प्रतिष्ठान
M – 9869674820

ई साहित्य प्रतिष्ठानची इतर विनामुल्य ई साप्ताहिके –

नेटाक्षरी , स्वरनेटाक्षरी ऑडिओ अल्बम , बाल नेटाक्षरी , ई श्टाप

आणि

प्रसिध्द झालेली ई बुक्स –

टल्लीची शाळा ,मकरंदच्या त्रिवेण्या ,ग्रेव्हयार्ड लिटरेचर ,चार क्षण ,तो आणि ती , प्रियेचे अभंग ,देशी दारुचे दुकान , ई शाळा

- संपर्क व प्रतिक्रियांसाठी -

esahitya@gmail.com

Mobile – 9869674820